**Shri Vile Parle Kelavani Mandal's**
**NARSEE MONJEE COLLEGE OF COMMERCE AND ECONOMICS**
**(Empowered Autonomous)**
Vile Parle (West), Mumbai-400 056

6th July, 2026.

# NOTICE

The Special Round One Admission process has been extended up to 7th July 2026.
**In view of the Government-declared holiday on Monday, 6th July 2026, due to heavy rains and in the interest of student safety, the college will remain closed on that day.**
Admissions will therefore be conducted on Tuesday, 7th July 2026, from 12:00 noon to 5:30 p.m. Students and parents are requested to visit www.mahafyjcadmissions.in regularly for further updates and information.

Please find below the revised admission schedule and holiday notice.

Dr. Parag Ajagaonkar
Principal

शिक्षण संचालनालय (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे

इयत्ता ११ वी केंद्रीय ऑनलाईन प्रवेश प्रकिया सन २०२६-२७

विशेष फेरी १ वेळापत्रक (ओपन टू ऑल)

(सुधारीत वेळापत्रक २)

| अ.क्र. | CAP प्रवेश कार्यवाही व सर्वसाधारण बाबी | कालावधी | Quota प्रवेश कार्यवाही व सर्वसाधारण बाबी | कार्यवाही |
|---|---|---|---|---|
| १. | • नविन विद्यार्थ्यांची नोंदणी आणि भाग-१ मधील दुरुस्ती करणे.<br>• विद्यार्थी पसंतीक्रम अर्ज भाग-२ भरणे.<br>• विद्यार्थी किमान १ आणि जास्तीत जास्त १० कनिष्ठ महाविद्यालयांचे पसंतीक्रम भरणे.<br>• विद्यार्थ्यांना त्यांच्या पसंतीक्रम, गुणानुसार कनिष्ठ महाविद्यालय दिले जातील.<br>• प्रवेश अर्ज लॉक करणे आवश्यक आहे. | २९ जून २०२६ दुपारी ०३.०० वा. ते ०१ जुलै २०२६ सायंकाळी ०६.०० वा. पर्यंत | • नविन विद्यार्थ्यांची नोंदणी आणि भाग-१ मधील दुरुस्ती करणे.<br>• विद्यार्थ्यांनी कोटा प्रवेशासाठी (व्यवस्थापन कोटा, संस्था अंतर्गत प्रवेश कोटा व अल्पसंख्याक कोटा) पंसतीक्रम ऑनलाईन नोंदविणे व लॉक करणे.<br>• (विशेष फेरी-१ मध्ये कोट्यांतर्गत प्रवेशासाठी कोटा पसंती अर्ज पुन्हा लॉक करणे आवश्यक आहे.) | प्रवेश अर्ज |
| २. | अलॉटमेंट प्रोसेस | ०२ जुलै, २०२६ ते ०३ जुलै २०२६ | अलॉटमेंट प्रोसस | अलॉटमेंट प्रोसेस |
| ३. | • वाटप प्रक्रिया (अलॉटमेंट प्रोसेस) (विशेष फेरी-१)<br>• पोर्टलवर फेरीसाठी कनिष्ठ महाविद्यालय वाटप यादी प्रदर्शित करणे.<br>• विद्यार्थ्यांच्या लॉगिनमध्ये प्रवेशासाठी वाटप केलेल्या कनिष्ठ महाविद्यालयांचा तपशिल प्रदर्शित करणे.<br>• कनिष्ठ महाविद्यालयांना वाटप केलेल्या विद्यार्थ्यांची यादी प्रदर्शित करणे.<br>• प्रवेश फेरीसाठी कटऑफ यादी प्रदर्शित करणे. (पोर्टलवर प्रसिध्द केले जाईल.)<br>• विद्यार्थ्यांना SMS व्दारे संदेश पाठविणे. | ०३ जुलै २०२६ रोजी दुपारी ०३.०० वा. | • कोट्यांतर्गत अर्ज केलेल्या विद्यार्थ्यांची यादी विद्यालयांच्या लॉगिन मध्ये दर्शविणे (इन-हाऊस, व्यवस्थापन, अल्पसंख्याक कोटा)<br>• विद्यालयांनी प्रवेशासाठी कोटा गुणवत्ता यादी/निवड यादी दर्शनी भागात प्रसिध्द करणे. | यादी प्रसिध्द करणे |
| ४. | • वाटप केलेल्या कनिष्ठ महाविद्यालयास सहमत असल्यास विद्यार्थ्यांनी प्रवेशासाठी पुढे जा (proceed for admission)<br>• कागदपत्र पडताळणीसाठी वाटप केलेल्या महाविद्यालयात उपस्थित राहणे आणि विहित शुल्क भरणे इत्यादी. विद्यार्थ्यांना वाटप केलेल्या कनिष्ठ महाविद्यालयात प्रवेश निश्चित करणे.<br>• महाविद्यालय लॉगिनवर प्रवेशाची पुष्टी, नकार आणि प्रवेश रद्द करणे. | ०३ जुलै, २०२६ दुपारी ०४.०० वा. ते ०८ जुलै, २०२६ रोजी सायंकाळी ६.०० वा. पर्यंत | • विद्यालयांनी प्रवेशासाठी पात्र विद्यार्थ्यांना संपर्क करणे (विद्यालयांनी कोट्यांतर्गत प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांना त्यांची निवड झाल्याबाबत व या कालावधीत प्रवेश घेण्यासाठी येण्याबाबत कळविण्यात यावे.)<br>• विद्यार्थ्यांनी कोट्यांतर्गत प्रवेश निश्चित करणे (संबंधित कोट्यांतर्गत प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांनी विद्यालयात जाऊन आपला प्रवेश निश्चित करणे.)<br>• विद्यालयांनी पात्र विद्यार्थ्यांचे कोट्यांतर्गत प्रवेश निश्चित करणे (विद्यालयांनी आपल्या विद्यालयात कोट्यांतर्गत प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांना आवश्यक संपूर्ण पडताळणी व कागदपत्रांची पडताळणी करुन विद्यार्थ्यांचे प्रवेश निश्चित करावे.) | प्रवेश |
| ५. | • पुढील प्रवेश फेरीचे वेळापत्रक जाहीर करणे. | ०८ जुलै, २०२६ रोजी सायंकाळी ६.००वा. | • पुढील प्रवेश फेरीचे वेळापत्रक जाहीर करणे. | वेळापत्रक जाहिर |
| ६. | • किनिष्ठ महाविद्यालय संबंधित कामकाज- राखीव. | ०८ जुलै, २०२६ सायंकाळी ६.०० वा. ते ०९ जुलै २०२६ दुपारी ०२.०० पर्यंत | • किनिष्ठ महाविद्यालय संबंधित कामकाज- राखीव. | डेटा प्रोसेस |
| ७. | • रिक्त जागा प्रदर्शित करणे. | १० जुलै, २०२६ दुपारी १०.०० वा. | • रिक्त जागा प्रदर्शित करणे. | डेटा प्रोसेस रिक्त जागा प्रदर्शित करणे |

टीप- महाराष्ट्र राज्यात काही ठिकाणी अतिवृष्टी झाल्याने काही जिल्ह्यांमध्ये दिनांक ०६/०७/२०२६ रोजी उच्च माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालयांना सुट्टी जाहिर करण्यात आली आहे. यास्तव या फेरीमध्ये सर्व विद्यार्थ्यांना त्यांचे प्रवेश निश्चित करण्यासाठी दिनांक ०८/०७/२०२६ पर्यंत कालावधी वाढवून देण्यात येत आहे. वरील वेळापत्रकानुसार प्रत्येक कार्यवाही उच्च माध्यमिक शाळा/ कनिष्ठ महाविद्यालये व विद्यार्थी आणि पालक यांनी वेळेत पूर्ण करावी.

(डॉ. महेश पालकर)

शिक्षण संचालक

(माध्यमिक व उच्च माध्यमिक)

शिक्षण संचालनालय, म. रा. पुणे

स्थळ: पुणे

दिनांक: ०६ जुलै, २०२६

**महाराष्ट्र शासन**
**शिक्षण निरीक्षक बृहन्मुंबई पश्चिम विभाग यांचे कार्यालय**
ईस्माईल युसुफ कॉलेज कंपाऊंड, जोगेश्वरी(पू), मुंबई-४०० ०६०.
दूरध्वनी क्र.०२२/२८२६५६४२/२८२०४३३५ ई-मेल-ssaeiwestgrmumbai@gmail.com

---

क्र.शिनि/पवि/माध्य-६ /२०२६/ दिनांक:-०५.०७.२०२६

प्रति,

मुख्याध्यापक
सर्व व्यवस्थापनाच्या, सर्व माध्यमाच्या
माध्यमिक शाळा पश्चिम विभाग,मुंबई

**विषय:** हवामानशास्त्र विभाग, मुंबई यांनी दिलेल्या अतिवृष्टीच्या इशाऱ्याच्या अनुषंगाने सोमवार दि.०६.०७.२०२६ शाळांना सुट्टी जाहीर करणेबाबत.

**संदर्भ:** विभागीय शिक्षण उपसंचालक, मुंबई विभाग, मुंबई यांचे पत्र जा. क्र.शिउस/संकीर्ण/२०२६ दिनांक ०५.०७.२०२६ चे अधिकृत पत्र.

उपरोक्त विषय व संदर्भांकित पत्राच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, हवामानशास्त्र विभाग, मुंबई यांचेकडून दि. ०५.०७.२०२६ रोजी प्राप्त झालेल्या हवामान अंदाजानुसार मुंबई क्षेत्रात मुसळधार पाऊस, सोसाट्याचा वारा सुटणे तसेच झाडे पडणे अशा आपत्कालीन घटना घडण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

त्यामुळे विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा आणि प्रवासाचा विचार करता, विभागीय शिक्षण उपसंचालक, मुंबई विभाग यांच्या आदेशानुसार पश्चिम विभागातील (Zone West) सर्व माध्यमांच्या आणि सर्व व्यवस्थापनांच्या सर्व प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांना उद्या सोमवाार, दिनांक ०६ जुलै २०२६ रोजी सुट्टी जाहीर करण्यात येत आहे.

तरी सर्व शाळांनी आपल्या स्तरावरून विद्यार्थी आणि पालकांपर्यंत याबाबत तातडीने माहिती पोहोचवावी व सुरक्षिततेच्या नियमांचे काटेकोरपणे पालन करावे.

(संजय जावीर)
शिक्षण निरीक्षक बृहन्मुंबई
पश्चिम विभाग

प्रत, माहिती व कार्यवाहीस्तव
मा. विभागीय शिक्षण उपसंचालक, मुंबई विभाग,मुंबई